# अहमदनगरजिल्ह्यातील असंघटित क्षेत्रावर कोविड-१९ चा झालेला आर्थिकव सामाजिक परिणाम.

**डॉ. बा. आ. साबळे**
सहा. प्राध्यापक तथा संशोधक मार्गदर्शक
श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय सिरसाळा ता. परळी वै. जि. बीड
**प्रा. वि. भ. काळे**
राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर

**प्रस्तावना :-**

कोविड-१९ विषाणूच्या संक्रमणामुळे निर्माण झालेले संकट भारतातील असंघटित क्षेत्रामध्येकाम करणाऱ्या 42कोटी कामगारांना गरिबीच्या खोल गर्तेत लोटून गेला याचा गंभीर परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर झाला. कोविड-१९चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी केंद्र सरकारने मार्च 2020 ला संपूर्ण देशामध्ये लॉकडाऊन घोषित केलं त्यामुळे या असंघटित कामगारांच्या रोजगारावर आणि मिळकतीवर नकारात्मक परिणाम झाला . सध्या निर्माण झालेली संकटाची स्थिती हाताळण्यासाठी पुरेशी तयारी नसलेल्या देशात भारताचा समावेश असल्याची जाणीव आपल्याला वेळोवेळी होताना दिसून येते .कोविड-१९ चा विषाणू रोखण्यासाठी करण्यात आलेल्या उपाय योजनांचा फटका भारतातील असंघटित क्षेत्रातील कोट्यावधी कामगारांना बसलेला आहे. लॉकडाऊन सारख्या उपाय योजनांमुळे फटका बसलेल्या असंघटित क्षेत्रातील कामगारांची संख्या नायजेरिया , भारत आणि ब्राझील या देशां मध्ये सर्वाधिक आहे . भारतात एकूण कामगार लोकसंख्या पैकी 92% लोक असंघटित क्षेत्रात काम करतात त्यामुळे सध्याच्या संकट काळात असंघटित क्षेत्रातील सुमारे 42कोटी कामगारांवर दारिद्र्य आलेल आहे . त्यामुळे शहरांमध्ये स्थायिक झाले ल्या कामगारांवर या लॉकडाउनच्या स्थितीत ग्रामीण भागाकडे परत येण्याची वेळ आली . नैसर्गिक आपत्ती ,सत्तीचे विस्थापन, विविध संघर्ष आदींचा सामना करणाऱ्या देशांमध्ये सध्याच्या जागतिक साथीच्या रोगांमुळे अतिरिक्त भर पडली.कोविड-१९ शी सामना करण्यासाठी असंघटित क्षेत्रातील कामगार सक्षम नाही त तसेचया वर्गाला उपलब्ध असलेल्या मूलभूत सोयीसुविधा विशेषत आरोग्य आणि स्वच्छता मर्यादित आहे त. त्यांना चांगले काम , सामाजिक संरक्षण, आर्थिक संरक्षण , कामाच्या ठिकाणी सुरक्षा या बाबींपासून वंचित राहावे लागते . कोविड-१९ मुळे जागतिक स्तरावर 2008-09 पेक्षाही मोठे आर्थिक संकट निर्माण झाले ले आहे. राहण्याच्या सोयी सुविधा , अन्न सेवा, उत्पादन रिटेल, व्यापार आणि प्रशासकीय कामकाजात या क्षेत्रांना खूप मोठ्या प्रमाणात धोका निर्माण झा ला. जागतिक पातळीवर खूप मोठी बेरोजगारीची लाट निर्माण झाली.

कोविड-१९ मुळे असंघटित कामगा रांवर उपासमारीची वेळ आ ली. जगाचा पोशिंदा असलेला शेतकर्याच्या फळ बागाला लॉकडाउन मुळे बाजार मिळाला नसल्याने कवडीमोल भावात फळ पिक विकावे लागले. बिगारी कामगार, भाजीपाला विक्रेते यांचे हातावर पोट असल्यामुळे त्यांना खूप मोठ्या प्रमाणात सामाजिक-आर्थिक त्रास

सहन करावा लागतो. बांधकाम कामगार व घर काम करणाऱ्या स्त्रियांचे काम बंद झा ले त्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीवर वाईट परिणाम होऊन हलाखीची परिस्थिती निर्माण झालेली आहे . जगभरात ज्या काही मूठभर देशांच्या अर्थव्यवस्था झपाट्याने विकसित होत आहेत त्या त भारताचा वरचा क्रमांक लागतो . त्यामुळे भारता चे आर्थिक भवितव्य उज्वल असल्याचा विद्यमान सरकारला जबरदस्त अभिमान वाटत असला तरी वस्तुस्थिती नेमकी याच्या उलट आहे कारण भारतीय अर्थव्यवस्थेत असंघटित कामगा रांचे प्रमाण हे 92 % आहे याच कामगारांची आर्थिक स्थिती सध्या कोविड-१९मुळे बिकट झालेलीआहे . असंघटित क्षेत्रातील 42 कोटी कामगा रांचे देशाच्या GDP मध्ये 50% योगदान देतात. काम बंद हाती पैसा नाही. पैसा नाही तर घर गाढा कसा हाकायचा. सतत दुष्काळाशी करावा लागत असलेला सामना आणि आर्थिक परिस्थिती बेताची गावाकडे कामधंदा मिळेना या ना त्या कारणामुळे ग्रामीण भागातील असंख्य नागरिक रोजीरोटीच्या निमित्ताने मोठ्या शहरां कडे जातात हे लोक कंत्राटी किंवा हंगामी काम करतात कंत्राटदाराच्या मनात आले तर त्यांना काम मिळते परिणा मी घरातील चूल पेटत असते तर हजारोंच्या संख्येने नाक्यावरील कामगारांना रोज कामाचा शोध घ्यावा लागतो ही वस्तुस्थिती आहे. यातच चीनमध्ये सुरू झालेला . कोविड-१९चा प्रसार संपूर्ण जगभर झा ला. आपल्या देशा तही कोविड-१९ चा फैलाव झाला व तो रोखण्यासाठीलॉकडाउन करावे लागले अत्यावश्यक सेवा वगळता सर्वच लॉकडाउनकरण्यात आले.

**कोविड-१९ संकल्पना** :-

17 नोव्हेंबर2019 मध्ये चीनच्या हुबेई प्रांताची राजधानी वूहान मध्ये या नवीन आजाराची पहिली ओळख करण्यात आली होती आणि त्या नंतर जागतिक स्तरावर या आजाराचा प्रसार झाला व त्या ने जागतिक महामारी चे रूप धारण केले महाराष्ट्रातील कोरोना विषाणू उद्रेकातील पहिल्या रुग्णाची नोंद 9 मार्च 2020 रोजी पुण्यात झाली. हा विषाणू प्रामुख्याने जवळच्या संपर्का दरम्यान, खोकल्यामुळे, शिंकण्याने किंवा बोलताना नकळत बाहेर पडणाऱ्या थुंकीच्या तुषारा मुळे लोकांमध्ये पसरतो. हे विषाणू 72 तासापर्यंत दुषित पृष्ठभागावर जिवंत राहू शकतात. या रोगाच्या निदानाची मान क पद्धत म्हणजे नाकातून घेतलेल्या नमुन्यांची रि अल टाईम रिव्ह र्स ट्रान्स क्रिप्शनपॉलीमरेज चेन रिएक्शन (RRT-PCR) नावाची तपासणी हो य. जागतिक आरोग्य संघटनेने हा कोरोनाव्हायरस हा रोग 2019 (कोविड-१९) चा उद्रेक हा सार्वजनिक आरोग्यासाठी आंतरराष्ट्रीय आणीबाणी असल्याचे सांगत या उद्रेकाला जागतिक महामारी म्हणून जाहीर केले.कोविड-१९ हे नाव टेड्रोसअॅडम हॅनोम गेब्रेयेसोस यांनी घोषित केले. इंटरनॅशनल कमिटी ऑफ टोक्सोनॉमीऑफ व्हायरस यांनीSARS-Cov-2हे नाव दिले.

**कोविड-१९ चे लक्षण :-**

सर्दी, ताप, कोरडा खोकला , दम लागणे , श्वास घेण्यात अडचण, घसा खवखवणे , मळमळ, अतिसार, वास किंवा चव जाणे, अंगदुखी, डोकेदुखी.

**संशोधन विषयाचे चे महत्व व आवश्यकता :-**

**कोविड-१९ चे अर्थव्यवस्थेत अर्थव्यवस्थेवर झालेले परिणाम :-**

आज कोरोना मुळे संपूर्ण जग अडचणीत आले. बहुतांश देशाचेआर्थिक व्यवहार ठप्प झालेले दिसून येत आहेत. यामुळे देशांतर्गत उत्पादन सेवा आणि उद्योग बंद करण्यात आले. या कामात आरोग्य सेवेवर मोठा निधी खर्च होत आहे या कामात निधी कमी पडला तर इतर विकासकामांना कात्री लावून तो निधी आरोग्य व इतर अत्यावश्यक सेवेवर खर्च करण्यात येईल यात काही शंका नाही. 2020-21 या आर्थिक वर्षामध्ये प्रत्यक्ष कर संकलनात1.44 लाख कोटी रुपयांची तुट पडली. या शिवाय GST कर संकलना मध्ये मोठी तुट दिसुन येतेय मार्च 2020 या महिन्याचे नियोजित कर संकलन 1.25 लाख कोटी होते परंतु प्रत्यक्षात 0.98 लाख कोटी कर संकलन झाले. फेब्रुवारी 2020 अखेर पर्यंत जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार वित्तीय तूट 3% वरून 5% पर्यंत वाढली. यामुळे अंदाजित उत्पन्न आणि प्रत्यक्ष मिळालेले उत्पन्न यामध्ये मोठी तफावत दिसून येते. जागतिक मंदीमुळे जागतिक बँक व इतर वित्तीय संस्था यांच्याकडून कर्ज घेण्यावर काही मर्यादा येणार आहेत देशातील टाळेबंदी मुळे विविध उद्योग मोठ्या प्रमाणावर बाधित झाले आहेत यामध्ये प्रामुख्याने बांधकाम व्यवसाय, पर्यटन उद्योग, वाहन उद्योग, वित्तीय संस्था, हॉटेल उद्योग, वाहतूक उद्योग, माहिती तंत्रज्ञान क्षेत्र आणि या सर्व व्यवसायात वर अवलंबून असणारे इतर छोटे मोठे उद्योग व सेवा क्षेत्र मोठ्या प्रमाणावर बाधित झालेले आहे यामुळे असंघटित कामगारांचे रोजगार जाऊन त्यांच्यावर खूप मोठे आर्थिक संकट निर्माण झाले.भारतामध्ये दर तीन महिन्यांनी GDP मधील वाढ किंवा घटीचे आकडे प्रकाशित होत असतात. ही पद्धत 1996 पासून आज पर्यंत सुरू आहे 2020-21 च्या पहिल्या तिमाहीत (एप्रिल-जून) भारतीय GDP मध्ये 23.9%घट नोंदवली गेली. जगामध्ये भारताचा GDP सर्वात जास्त घसरला आहे. भारताच्या GDPची जगातील इतर देशांच्या GDP शी तुलना केली असता भारत -23.9% युके -20.4% फ्रान्स -13.8% इटली -12.4% कॅनडा -12% जर्मनी -10.1%युएस -9.5% जपान -7.6% भारताचा GDP चा घसरण दर जास्त आढळून येईल.

**कोविड-१९ एक गंभीर समस्या** :-

कोरोना विषाणूंचा वेगाने फैलाव झाल्याने अवघ्या जगावर त्याचे परिणाम जाणवले.कोविड-१९ ही जागतिक महामारी घोषित झाली. अजूनही संपूर्ण जगामध्ये लसीकरण होणे आणि ही स्थिती बदलण्यासाठी लस किती उपयुक्त आहे हे ठरविणे बाकी आहे.विषाणूंचा प्रसार होत असल्याने राज्य सरकारांनी मुक्तसंचारावर लावलेल्या निर्बंधांमुळे सर्वात मोठा परिणाम सेवा क्षेत्रावर झाला लोकांना कामाच्या ठिकाणी सार्वजनिक वाहनातून जाता येत नसल्याने बेरोजगारी वृद्धी झाली. भारतातील बहुसंख्य रोजगार असंघटित क्षेत्रात असल्यामुळे कामाच्या अभावाने लाखो स्थलांतरित मजूर यांना त्यांच्या मूळ गावी परतावे लागले या धोरणामुळे अनेक कंपन्यांना त्यांच्या कामकाजात मोठा बदल करावा लागला.कोरोणाच्या उद्रेकामुळे सोशल डिस्टंसिंग च्या नियमाने वर्क फ्रॉम होम चा प्रसार झाला.कोविड-१९ चा उद्रेक झाल्याने सरकारी आणि मध्यवर्ती बँकांनी जागतिक मंदीच्या काळापेक्षाही मोठ्या प्रमाणात प्रोत्साहनपर आर्थिक पॅकेज जाहीर करावी लागली.महाराष्ट्रातील महा विकास आघाडी शासनाने लॉकडाऊन मुळे बाधित होणाऱ्या कामगारांसाठी आर्थिक पॅकेज जाहीर केले केंद्र शासनाने ही याच धर्तीवर आर्थिक पॅकेज जाहीर करावे अशी मागणी समाज माध्यमावर होताना दिसून येत आहे. राज्यात निर्बंध सुरू करण्यात आले, राज्यातील उद्योग व दुकाने यांचे काम बंद झाल्याकारणाने राज्यातील असंघटित क्षेत्रातील कामगारांचे उत्पन्न बंद होणार असल्याने या घटकावर

या काळात कसे जगायचे असा प्रश्न आहे राज्य शासनाने आर्थिक पॅकेज जाहीर केले परंतु नोंद कामगारांना हे आर्थिक सहाय्य देण्यात येईल ही अट अन्यायकारक आहे त्यामुळे बहुसंख्य कामगारांना या आर्थिक पॅकेजचा लाभ मिळणार नाही म्हणून शासनाने कामगारांची नोंदअसण्याची अट रद्द करून सर्व असंघटित कामगारांना आर्थिक पॅकेज द्यावे. भर उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये कुंभार व्यवसाय आर्थिक अडचणीत असलेला आपल्याला पाहायला मिळेल. या कुंभार व्यवसाय करण्यार्याची नोंद सरकार दरबारी नसते मग यांना आर्थिक मदत कशी मिळेल हे महाराष्ट्र सरकार ने नियोजन करायला पाहिजे.

**जनसामान्यांचे जनजीवन विस्कळीत :-**

कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे आपल्यापैकी अनेकांच्या जीवाला घोर लावला आहे इतकंच नाही तर या जागतिक साथीचा लोकांच्या मन स्वास्थ्यावर विपरीत परिणाम झालेला आहे आणि हे आरोग्यआरोग्य संकट निघून गेल्यावरही त्यांना मानसिक समस्यांचा सामना करावा लागेल भारतीय अर्थव्यवस्थेतील 92% कामगार असंघटित क्षेत्रांमध्ये कार्य करतात पण या कोरोना साथीमुळे या असंघटित कामगारबेरोजगार होऊन त्याच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.

**अनाथांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न :-**

कोरोना काळात जन्मापासून अनाथ असणारी आणि कोरोना मुळे ज्यांच्या पालकांचे निधन झाले अश्या मुलांचा उदरनिर्वाहाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या मुलांपैकी अनेकांसमोर दोन वेळचे जेवण मिळवणे हेच आयुष्याचे ध्येय बनले. अनाथालयाचे य छत्र सुटल्यानंतर अनेक मुले एकत्र येऊन भाड्याच्या खोलीत राहत मात्र रोजगारच नसल्याने भाडे भरण्याची ऐपत नसलेल्या तरुणांना नैराश्याने घेरले आहे टाळेबंदी च्या काळात प्रचंड हाल झाले असे संशोधन करत्याच्या लक्षात आले म्हणून यावर संशोधन होणे संशोधन करत्याला आवश्यक वाटले.

**संशोधनाचे उद्दिष्टे :-**

1. कोविडचा असंघटित क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे१९-.
2. कोविड.चा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेल्या परिणामाचा उपाययोजनात्मक अभ्यास करणे१९-

**ग्रहीतके :-**

1. कोविड चा१९-भारतीय अर्थव्यवस्थेवर अनुकूल व प्रतिकूल परिणाम होत आहे.
2. कोविड.मुळे असंघटित क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम होत आहेत १९-

**असंघटित क्षेत्राची कोविड-१९ काळातील परिस्थिती :-**

**दिवसेंदिवस वाढती बेरोजगारी :-**

अहमदनगर जिल्ह्यात बेरोजगारी ही मोठ्या प्रमाणात वाढलेली असतानाकोविड-१९मुळे कंपन्यांना टाळेबंदी लागली या टाळेबंदी मुळे हंगामी रोजगार आणि कंत्राटी कामगार यांना कोणी वाली राहिलेला नाही. या स्थितीत या कामगारावर अति दारिद्र्य आलेले असताना त्यातून घरभाडे जेवणाचा खर्च देखील हे लोक करू शकत नाहीत

सरकारची तुटपुंजी मदत किती दिवस चालणार छोटी छोटी हॉटेल्स, खाद्यपदार्थांच्या गाड्या, छोट्या चहाच्या टपऱ्या, यात काम करणारे लोक आर्थिक अडचणीत आले त्यातच अहमदनगर जिल्हा हा राज्याच्या मध्यभागी येतो त्यामुळे बाहेरून आलेले मजुरांची संख्या येथे जास्त आहे लॉकडाऊन च्या काळात या मजुरांना परत गावी जाण्यासाठी देखील पैसे राहिलेली नव्हटे. अहमदनगर शहरांमध्ये घर काम करणाऱ्या स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे कोरोणा व्हायच्या भीतीपोटी या महिलांचे काम गेले आणि लोकांच्या घरात स्वयंपाकाचे काम करणाऱ्या या स्त्रियांची घरची चूल पेटणे बंद झाली. भाजीविक्रेते बिगारी कामगार यांचे हातावरचे पोट काम मिळणे बंद झाल्याने तर या लोकांना दोन वेळचे जेवण मिळणे कठीण झाले किती हि दारिद्र्याची अवस्था.

**अहमदनगर जिल्ह्यातील शेती क्षेत्रावर झालेला परिणाम :-**

भारत हा कृषिप्रधान देश. देशात 65% रोजगार हा शेती क्षेत्रातून प्राप्त होतो ह्या क्षेत्राचा 2020-21 या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत जी डी पी मधील वाढ 3.4% नोंदवली गेली जेव्हा भारताचा जीडीपी 23.9% होता. तरीपण लॉकडाऊन मुळे अहमदनगर जिल्ह्यातील फळबाग शेतकऱ्यांवर वाईट वेळ आली त्यांच्या फळांना या लॉकडाऊन मध्ये वेळीच बाजार मिळाला नाही म्हणून सर्व फळबागा ग्राहकाविना ओस पडून होत्या.

**अहमदनगर जिल्ह्यातील कोविड-१९ चा व्यवसाय क्षेत्रावर झालेला परिणाम**:-

भारत सरकार ने 24मार्च 2020 रोजीच्या सायंकाळी 21 दिवसांचा लॉकडाऊन घोषित केला आणि 138 कोटी लोकसंख्या स्वतःच्या घरामध्ये कैद झाली. त्यात लहान व्यावसायिकांचे कंबरडे मोडले. वडापाव गाडी चालवणारे व्यावासिक,चहाची टपरी वाले, लहान लहान हॉटेल, सगळे बंद पडले ज्यांनी नवीन उद्योग, व्यवसाय सुरु केला त्याचा पैसा डब्यात गेला. काही नव-उद्योजकंवर तर आत्महत्या करण्याची वेळ आली या कोविड-१९ने कित्येक व्यावासिकांचे जीव घेतले. त्यामुळे या क्षेत्रात काम करणार्यांचा रोजगार गेला परिणाम यांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती हलाखीची बनली.

**स्थलांतरित कामगारांचीपरिस्थिती** :-

केंद्रसरकारने लॉकडाऊन ची प्रक्रिया सुरू केली तेव्हा लोकांना वाटले हे फक्त थोडा काळाकरिता राहील पण सरकारने ही प्रक्रिया पुढे तशीच सुरू ठेवली प्रथम25 मार्च 2020 ते 14 एप्रिल 2020 हे लॉकडाऊन 21 दिवसांचे, 15 एप्रिल 2020 ते 3 मे 2020 हे लॉकडाऊन 19 दिवस, 4 मे 2020 ते 17 मे 2020 हेलॉकडाऊन 14 दिवस, 18 मे 2020 ते 31 मे 2020 हे लॉकडाऊन 14 दिवस असे 68 दिवस ही प्रक्रिया चालली या कालावधीत जे स्थलांतरित कामगार आहेत त्यांच्या जवळील पैसे संपले त्यांचे खायचे हाल व्हायला लागल्यामुळे ते परत त्यांच्या घराकडे निघाले. परत जाण्यासाठी वाहने नव्हती म्हणून त्यांना पायी-पायी, सायकल ने जावेलागले. वाटेत खाण्यापिण्यासाठी त्यांना बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागले. बरेच कामगार परराज्यातून आलेले होते बऱ्याच कामगारांचा मे महिन्यातील कडक उन्हात उपासमारीने आणि चालून-चालून मृत्यू झाला. त्यात शासनाचा गलथान कारभार या लोकांच्या जीवावर आला. लाल फितीचा प्रक्रिया पूर्ण व्हायला काही दिवसांचा काळ लोटला कामगारांचे हाल व्हायला लागले बऱ्याच ठिकाणी निदर्शने गोंधळ पाहायला मिळालालाखो कामगार प्रामुख्याने बांधकाम क्षेत्र, हॉटेल, वडापावच्या गाड्या, चहाच्या टपऱ्या, बिगारी काम करणारे आहेत यांची मुळातच आर्थिक परिस्थिती ही दारिद्र्याची आहे.

**कोविड-१९ चे सामाजिक व आर्थिकपरिणाम :-**

**सामाजिक,अनुकूल परिणाम:-**

1. सार्वजनिक वाहतूक बंद,खाजगी वाहतुक बंद असल्यामुळे हवेचा दर्जा सुधारलेला आहे ,
2. कारखाने बंद जल पर्यटन बंद असल्यामुळे पाण्याचा दर्जा सुधारला पिण्यासाठी स्वच्छ पाणी उपलब्ध , .झालेल आहे
3. लोकांना कोरोनाव्हायरस मुळे आरोग्याचे काळजी घेण्याची सवय लागली उदा , साबणाने हात धुणे . तो ,खोकताना ,सॅनिटायझर चा वापर करणे सार्वजनिक ठिकाणी नथुंकणे शिंकताना ंडाला रुमाल लावने.
4. मानवतेच्या दृष्टिकोनातून समाजातील लोक एकमेकांची मदत करण्यासाठी समोर आले
5. या दगदगीच्या जीवनात माणूस कुटुंबापासून व नातेवाईकांपासून दुरावत होता या महासाथीतील लॉकडाऊन मध्ये कुटुंबासोबत व नातेवाईकांसोबत वेळ घालवला त्यामुळे नात्यांमध्ये गोडवा निर्माण झाला.
6. लोकांना वर्क फ्रॉम होम मुळे तंत्रज्ञानाचा वापर करावा लागेला त्यामुळे तांत्रिक ज्ञानमध्ये वाढ झाली.

**प्रतिकूल परिणाम** :-

1. कोरोनाव्हायरस अकाली निधनामुळे कुटुंबच्या कुटुंब उध्वस्त झाले.
2. समाजामध्येवाईट प्रवृत्ती मध्ये वाढ झालीउदा.चोरी करणे .
3. भीतीयुक्त वातावरणामुळे तनावजन्य परिस्थितीत वाढ झाली.
4. जीवनचक्र कोलमडले.
5. शाळा.प्रशासकीय कार्यालय बंद असल्यामुळे समाजजीवन विस्कळीत झाले ,कॉलेज,

**आर्थिक परिणाम ,अनुकूल परिणाम :-**

1. या कोविड.साथी मध्ये लोकांना बचतीचे महत्व समजले१९-
2. सरकारला अशा महासाथीच्या विरुद्ध लढण्यासाठी अगोदर कोणकोणती अतिरिक्त काळजी घ्यावी लागते याबद्दल ज्ञान प्राप्त झाले आरोग्य , अतिरिक्त ऑक्सिजनचा साठा , अतिरिक्त हॉस्पिटलची निर्मिती .उदा . .अतिरिक्त राखीव निधी ,कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण
3. पी केअर फंड मध्ये सर्व देशातील लोकांनी आर्थिक मदत केली तेव्हा द .एम .ेशाची एकात्मता दिसून आली.
4. कोविड.मुळे सरकारला अर्थव्यवस्थेतील कमजोर बाजू निदर्शनास आली १९-

**प्रतिकूल परिणाम :-**

1. बेरोजगारीत वाढ.
2. समाजाचा आर्थिक गणित बिघडले.
3. दारिद्र्या मध्ये वाढ झाली.

**निष्कर्ष :-**

1. कडक निर्बंध लावल्यामुळे गरीब कामगारांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक स्थिती खालावली आहे
2. पैसे नसल्यामुळे व मालकांनी घर भाड्याचा तगादा लावल्यामुळे हे लोक पुन्हा त्यांच्या मूळ गावी स्थलांतरित करीत आहे
3. बस रेल्वे सेवा बंद असल्याने किंवा त्यांचे भाडे द्यायला तेवढे पैसे नसल्याने हे लोक पायी प्रवास करत , आहेत
4. आर्थिक स्थिती खालावल्यामुळे कामगारांना दोन वेळचे जेवण व्यवस्थित मिळत नसल्याने त्यांच्या आरोग्यावरही परिणाम होत आहे
5. मजूर बऱ्यापैकी वेगवेगळया ठिकाणावरुण कामानिमित्त येथे आले असल्याने त्यांना स्थानिकरेशन दुकानातून धान्य मिळेत नाही
6. भत्ता जेवणाची जबाबदारी घ्यायला तयार , वेतन मिळत नाही मालक वर्ग या कामगारांची राहण्याची , नसल्याचे दिसून येत आहे
7. गरीब लोकांसाठी असलेल्या शिवभोजन थाळी ची संख्या कमी असल्याने सर्व कामगारा पर्यंत हि योजना पोहोचत नाही तसेच या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर गर्दी होऊन लांबच लांब रांगा लागत आहेत.
8. लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी सरकार कडून कोणत्याही प्रकारची हेल्पलाइन सुविधा निर्माण करण्यात आली नाही.
9. स्वयंसेवी संस्था म्हणावे इतका या लोकांसाठी पुढाकार घेत नाही

**उपायोजना :-**

1. सरकारने शिवभोजन थाळी सारख्या योजना राबूउन थाळी च्या संख्येमध्ये वाढ करावी
2. स्वयंसेवी संस्था पुढे येऊन ह्या लोकांना कपडे.औषध या गोष्टीची मदत केली पाहिजे-अन्न .
3. सरकारनेया लोकांना आर्थिक भत्ता देउन मदत करावी.
4. ह्या लोकांच्या कर्जाचे हप्ते वसुलीवर काही कालावधीसाठी बंदी घालवी.
5. हे लोक ज्या घरात राहत आहे त्या घर मालकांनी घर भाडे वसुली काही काळ थांबवण्याचे आदेश सरकारने द्यावेत.
6. वेगाने लसीकरण करून आणि कडक निर्बंध लाऊन व्यवसाय करण्यास परवानगी देता येईल का याबाबत तपासणी करावी.
7. स्वस्त धान्य दुकानातून ह्या लोकांना कुटुंबाला पुरेल एवढे धान्य मिळावे आधार कार्ड रेशन कार्ड या बाबत काही प्रमाणात सूट द्यावी.
8. लोकांनी सतत हात धुण्याची सवय लाऊन आरोग्याची पुरेशी काळजी घ्यावी याबाबत सामाजसेवकानी प्रबोधन करावे.

9. लोकांच्या अडचणी सोडविण्यासाठी हेल्पलाइन नंबर सुविधा सुरू कराव्यात
10. विधवा ज्येष्ठ व्यक्ती अपंग यासारख्या व्यक्तींना मदत करावी
11. देवस्थानांनी या लोकांसाठी अन्नछत्र व आरोग्यविषयक सुविधा उपलब्ध करून द्यायला पाहिजे
12. जे लोक त्यांच्या मूळ गावी परतु इच्छितात त्यांच्या जाण्याची सुविधा सरकारने करून द्यायला पाहिजे

**संदर्भसूची :-**

01. डॉश्र,आगलावे प्रदीप .ी साईनाथ प्रकाशन.सहावी आवृत्ती ,नागपूर ,
02. www.esakal.com
03. www.orfonline.org
04. www.who.int
05. www.livescience.com
06. www.bbc.com
07. www.lokmat.com
08. mr.wikipedia.org
09. maharashtratimes.com
10. pib.gov.in